# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.02.2025** **वार- गुरुवार**

---

**ओम बिर्ला**

भारतीय तरूण जगात सर्वात बुद्धिमान आणि सामर्थ्यशाली असून जगातील मोठ्या समस्या सोडवण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आज पुण्यात केलं. भारती अभिमत विद्यापीठाचा 26वा पदवी प्रदान समारंभ बिर्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला; त्यावेळी ते बोलत होते. देशाच्या विकासात पुण्याने मोठं योगदान दिलं असून पुणे ही समाज सुधारकांची भूमी असल्याचं बिर्ला म्हणाले. विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात 6 हजार आठशे 15 विद्यार्थ्यांना पदवी आणि पदविका प्रदान करण्यात आली.

**मराठी भाषा**

मराठी राजभाषा गौरव दिन आज पुण्यात सर्वत्र अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येत आहे. अक्षर रसिक सुलेखन वर्गानं आज माय मराठी अक्षरोत्सव, या विषयावर शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचं आयोजन केलं होतं. यामध्ये समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात सांगितलेल्या लेखनक्रिया निरूपणातील महत्त्वाच्या ओव्यांचा दाखला देऊन अक्षरांचं वैशिष्ट्यपूर्ण वळणं, शुध्दलेखन; देवनागरी लिपीचा इतिहास, समजावून सांगण्यात आला.

20 शाळांमधल्या अडीच हजार विद्यार्थींना याचा आनंद घेतल्याचं सुलेखन अभ्यासक शैलेश जोशी यांनी सांगितलं. पुण्यातल्या रमणबाग प्रशालेत साहित्यिक ओळखा आणि साहित्यकृती सांगा, हा उपक्रम घेण्यात आला. साईनाथ मंडळ ट्रस्ट आणि शनिवार पेठेतल्या नवीन मराठी शाळेनंही आज लाल महाल आणि शनिवार वाडा परिसरात विशेष कार्यक्रम घेतला. यावेळी संत, राष्ट्रपुरुष, क्रांतिकारक, समाजसुधारक यांची वेषभूषा परिधान करून शालेय विद्यार्थ्यांनी मराठीचा जयघोष केला आणि मराठीत बोलण्याची शपथ घेतली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनंही आज मराठी भाषा दिनाचं औचित्य साधून सुलेखन कार्यशाळा घेतली. तळेगाव दाभाडे इथल्या इंद्रायणी महाविद्यालयाच्या मराठी विभागानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात लेखक जगदीश ओहोळ यांनी मराठी भाषेचं महत्त्व अधोरेखित केलं.

**सरनाईक-मुंबई**

परिवहन सेवेत असलेल्या सर्व बसमध्ये सीसीटीव्ही आणि जीपीएस यंत्रणा तातडीनं लावली जाईल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना सांगितलं. पुण्यातल्या स्वारगेट एसीटी बस स्थानकात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर अत्याचार झाल्याचं काल उघड झालं; त्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व बसडेपोंमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली जाईल, राज्यातल्या सर्व बस स्थानकांत महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणार असल्याचंही सरनाईक यांनी सांगितलं. याप्रकरणी 23 सुरक्षा रक्षकांचं निलंबन केल्याची माहिती त्यांनी दिली.

**बक्षीस**

दरम्यान स्वारगेट बस स्थानकातल्या अत्याचार प्रकरणातल्या आरोपीची माहिती देणाऱ्याला एक लाख रुपयांचं बक्षीस पुणे पोलिसांनी जाहीर केलं आहे. या प्रकरणातला आरोपी मंगळवारपासून फरार असून त्याला शोधण्यासाठी 13 पथकं तैनात करण्यात आल्याचं पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. आरोपीची माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवली जाईल असंही त्यांनी सांगितलं.

**अर्थसंकल्प**

पुणे महापालिकेचा 2025-26 या वर्षाचा अर्थसंकल्प येत्या 4 मार्च रोजी सादर केला जाणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले सकाळी 11 वाजता अर्थसंकल्प स्थायी समितीला सादर करणार आहेत.

**पुणे मनपा**

स्थानिक स्वराज्य संस्था कर 1 जुलै 2017 पासून बंद होऊन वस्तू आणि सेवा कर लागू झाला आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेमधील स्थानिक संस्था कर येत्या 30 एप्रिलपासून कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. मात्र पुणे महापालिकेची सुमारे 200 कोटी रुपयांची स्थानिक संस्था कराची वसुली प्रलंबित आहे. त्यामुळे एलबीटी विभाग बंद करण्याच्या निर्णयाला एक वर्षाची मुदतवाढ मागावी आणि एक वर्षात वसुली कारवाई पूर्ण करावी अशी मागणी सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी केली आहे.

**आरओ प्लांट**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात जीबीएसचे रुग्ण आढळून आल्याने, गेल्या काही दिवसात 58 खाजगी आरओ प्लांट बंद करण्यात आले होते. मात्र, पिण्याच्या शुद्ध पाण्याची गरज लक्षात घेऊन ठराविक अटी आणि शर्तींसह हे प्रकल्प पुन्हा सुरू करण्यासाठी परवानगी देण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे.

**अंगणवाडी**

पुणे जिल्ह्यातील 385 अंगणवाड्यांना जागा नसल्याने त्या अन्य इमारतींमध्ये चालवल्या जात आहेत. त्यामुळे अंगणवाड्याच्या नवीन इमारती, जुन्या इमारतींचं नूतनीकरण आणि हिरकणी कक्ष उभारणीसाठी जिल्हा परिषदेनं 52 कोटी 25 लाख रुपयांची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे केली आहे. आता नव्याने सुमारे 130 अंगणवाड्यांचं बांधकाम करण्यात येणार आहे. सर्व अंगणवाड्यांची रचना एकाच पद्धतीनं केली जाणार असल्याचं पुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जामसिंग गिरासे यांनी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 35 तर किमान 16 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**